**महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादीत, मुंबई यांचा सन २०२०-२१ चा ४० वा वार्षिक अहवाल व सन २०२१-२२ चा ४१ वा वार्षिक अहवाल सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे :-**

- महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादीत यांचे सन २०२०-२१ व २०२१-२२ चे वार्षिक अहवाल तयार करुन भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी नियुक्त केलेल्या सांविधिक लेखा परिक्षक यांच्याकडून परिक्षित करुन घेण्यात आले.
- त्यानंतर सदर वार्षिक अहवालांवर भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय घेण्याकरीता महालेखापाल (लेखा परिक्षा) मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले.
- महामंडळाचे सन २०२०-२१ चे वार्षिक अहवाल ३०/०३/२०२२ रोजी व सन २०२१-२२ चे वार्षिक अहवाल २३/१२/२०२२ रोजी भारताच्या नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अभिप्रायांसह महालेखापाल कार्यालयाकडून महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळास प्राप्त झाले.
- महामंडळाच्या दिनांक २३/०९/२०२२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये सन २०२०-२१ च्या वार्षिक अहवालास व त्यावरील भारताच्या नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अभिप्रायांस मान्यता देण्यात आली. तसेच दिनांक १०/०३/२०२३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये सन २०२१-२२ च्या वार्षिक अहवालास व त्यावरील भारताच्या नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अभिप्रायांस मान्यता देण्यात आली.
- शासनमान्य पॅनेलमधील भाषांतरकार वार्षिक अहवालाचे भाषांतर करण्यास उपलब्ध नसल्याने वार्षिक अवहालाच्या भाषांतर करण्याच्या कार्यवाहीस तसेच छपाईस विलंब झालेला आहे.

उपरोक्त कारणांमुळे महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ, मुंबई यांचे सन २०२०-२१ व सन २०२१-२२ चे वार्षिक अहवाल मा. विधानमंडळ सचिवालयाकडे सादर करण्यास विलंब झालेला आहे.

(संजय देगांवकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन